सकाळ

सिंधुदुर्ग, शनिवार, ३० जुलै २०२२



झरेबांबर : येथे भात लावणी करताना हळबे महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे विद्यार्थी.

# हळबे महाविद्यालयातर्फे झरेबांबर येथे भात लावणी

**साटेली भेडशी :** हळबे महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाकडून झरेबांबर येथे सामाजिक जाणिवेतून भात लावणी करण्यात आली. 'दत्तक गाव' योजनेंतर्गत दोडामार्ग येथील लक्ष्मीबाई सीताराम हळबे कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाने या वर्षापासून झरेबांबर गाव दत्तक घेतले आहे. विभागामार्फत तेथील सार्वजनिक कामे केली जाणार आहेत. त्या उपक्रमाची सुरुवात तेथील गरजवंत शेतकऱ्यांना भात लावणीसाठी मदत करून झाली. यावेळी झरेबांबर येथील सरपंच श्रीमती स्नेहा गवस, ग्रामसेवक गायकवाड, महाविद्यालयाचे माजी विदयार्थी राजेश नाईक, करण शेटकर, संदीप जाधव, लिपिक श्री. सावंत आणि ग्रामस्थ, तसेच कार्यक्रम अधिकारी प्रा. दिलीप बर्वे, डॉ. राजेंद्र इंगळे, प्रा. प्रीती प्रसादी उपस्थित होते.